607

महाराष्ट्र शासकीय कर्मचारी तसेच जिल्हा परिषद व नगर परिषद कर्मचारी यांची गणना, एप्रिल १९८८

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग,
परिपत्रक क्रमांक-संकीर्ण-१०८८/४५७/प्र.क्र.९३/कोषागारे-४
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ दिनांक २६ एप्रिल १९८८

CR1988042601

## प रि प त्र क

अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई या कार्यालयामार्फत शासनाच्या सेवेतील सर्व कर्मचा-यांची, तसेच जिल्हा परिषदा व सर्व नगर परिषदा यांमधील कर्मचा-यांची गणना केली जाते. आता अर्थ व सांख्यिकी संचालनालयामार्फत अशी गणना १ एप्रिल १९८८ हा संदर्भ दिवस धरून जून व जुलै १९८८ मध्ये घेण्यात येणार आहे. ही गणना वेळेत व योग्य प्रकारे पार पाडण्यासाठी सर्व कार्यालयांनी खालील सूचना लक्षात घेऊन त्यानुसार कार्यवाही करावी असा आदेश शासन देत आहे :-

**[अ] शासकीय कार्यालयासाठी :-**

[१] सर्वसाधारणपणे कोषागार कार्यालये/अधिदान व लेखा कार्यालये येथून गणनेची प्रपत्रे देण्याची व्यवस्था करण्यात येईल. जिल्ह्यातील कार्यालयांनी, त्यांच्यासाठी व त्यांच्या खालील स्तरावरील कार्यालयांतील कर्मचा-यांची माहिती देण्यासाठी लागणारी गणना प्रपत्रे जिल्हा सांख्यिकी अधिकारी यांचे कार्यालयातून जून १९८८ च्या तिस-या आठवड्यात न्यावीत व ती त्यांच्या खालील स्तरावरील कार्यालयांना पुरवावीत.

[२] बृहन्मुंबईतील कार्यालयांनी त्यांना लागणारी गणना प्रपत्रे संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, जुने जकात घर, डी. डी. बिल्डींग, फोर्ट, मुंबई यांचे कार्यालयाने अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई आणि अधिदान व लेखा कार्यालय बांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रे, मुंबई येथे उघडलेल्या काऊंटरवरून त्याच काळात न्यावीत.

[३] जुलै, १९८८ ची वेतन देयके कोषागाराला सादर करताना त्या वेतन देयकातील कर्मचा-यांची व रिक्त पदांची [१ एप्रिल १९८८ ची] माहिती देणारी प्रपत्रे स्वतंत्र द्यावयाची आहेत.

[४] प्रपत्रे भरण्यासंबंधीच्या सविस्तर सूचना प्रपत्राबरोबरच्या सूचनापत्रकात दिल्या आहेत. त्याप्रमाणे सर्व कार्यालयांनी गणना प्रपत्रे भरण्याचे काम जून व जुलै १९८८ या कालावधीत पूर्ण करावे. माहिती भरण्यात काही अडचणी आल्यास, अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या जिल्हा कार्यालय/प्रादेशिक कार्यालय/ मुख्य कार्यालय यांच्याशी संपर्क साधून खुलासा करून घ्यावा.

[५] जुलै १९८८ च्या प्रत्येक वेतन देयकासोबत १ एप्रिल १९८८ रोजी आस्थापनेवर असणा-या कर्मचा-यांच्या बाबत देयकातील कर्मचा-यांच्या संख्येप्रमाणे

एक वा अधिक प्रपत्रे लागतील, राजपत्रित अधिका-यांची माहिती देखील एकत्र एकाच प्रपत्रात द्यावयाची आहे. १-४-१९८८ रोजी पद रिक्त असल्यास त्यासंबंधीची माहिती पत्रकात भरावयाची आहे.

[ब] <u>जिल्हा परिषदा व नगर परिषदा कार्यालयासाठी</u> :-

[६] जिल्हा परिषदा व नगर परिषदा यांना लागणारी या गणनेची प्रपत्रे जिल्हा सांख्यिकी कार्यालये पुरवतील.

[७] जिल्हा परिषदा, नगर परिषदा, तसेच ज्या शासकीय कार्यालयांतील कर्मचा-यांची वेतन देयके कोषागारातून काढण्यात येत नाहीत, अशा कार्यालयांनी त्यांच्या कर्मचा-यांची माहिती गणना प्रपत्रात भरुन ती जिल्हा सांख्यिकी अधिकारी यांच्याकडे ३१ जुलै १९८८ च्या आत पाठवावी.

[८] जिल्हा परिषदांचे जे सेवक अभिकरण तत्वावरील [ Agency Basis ] योजनांत काम करतात व ज्यांची देयके कोषागाराकडून वा उपकोषागाराकडून मंजूर होतात अशा सेवकांसाठी, शासकीय कार्यालयासाठी असलेल्या सूचनांप्रमाणे कार्यवाही करावी. जिल्हा परिषदांची माहिती देतांना असे सेवक वगळण्यात यावेत. मात्र देयकासोबतच्या प्रपत्रावर जिल्हा परिषदेचा शिक्का असणे आवश्यक आहे.

[९] जिल्हा परिषदा व नगर परिषदा यांच्या कर्मचा-यांच्या या गणनेच्या कामी सर्व पंचायत समिती मधील विस्तार अधिकारी [सांख्यिकी] यांनी सर्वतोपरी सहकार्य करावे आणि या गणनेची माहिती बिनचूक व वेळेवर मिळेल यादृष्टीने प्रयत्न करावेत.

२. सर्व कोषागारे/उप कोषागार अधिका-यांनी या गणनेच्या कामी अर्थ व सांख्यिकी संचालनालयास संपूर्ण सहकार्य देऊन त्यांच्याकडून गणनेबाबत जी कार्यवाही अपेक्षित असेल ती पार पाडावी. सर्व कार्यालयांना गणनेची प्रपत्रे भरण्यास जून व जुलै १९८८ अशी जवळजवळ दीड महिन्यांची मुदत दिली आहे. <u>जुलै १९८८ च्या प्रत्येक वेतन देयकासोबत भरलेले गणना प्रपत्र [प्रपत्रे] सादर न झाल्यास अशी देयके न स्वीकारता, संबंधित कार्यालयांना योग्य पूर्ततेसाठी परत करावीत</u>. मात्र जे राज्य शासकीय कर्मचारी नाहीत अशांच्या वेतन देयकाबाबत ही कार्यवाही लागू नाही. [उदा. मा. राज्यपाल, आमदार, मंत्रिमंडळाचे सर्व सदस्य वगैरे].

३. वेतन देयकासोबत मिळालेली गणना प्रपत्रे अर्थ व सांख्यिकी संचालनालयाचे कार्यालयात तत्संबंधी त्यांचेकडून देण्यात येणा-या सूचनेप्रमाणे कार्यवाही करुन त्यांचेकडे पाठविण्यात यावीत. जे उपकोषागार अधिकारी वेतन देयके स्वीकारुन ती मंजूर करण्यास सक्षम आहेत, त्यांनी सदरहू प्रपत्रे कोषागार अधिकारी यांचेकडे देयकाबरोबर न पाठविता, स्वतंत्रपणे अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या सूचनांप्रमाणे पाठवावीत.

४. वरील सूचना जिल्हा परिषदांकडील अभिकरण योजनांवरील कर्मचा-यांच्या देयकासही अभिप्रेत असून देयकासोबत भरलेले गणनापत्र नसल्यास, देयके जिल्हा परिषदांना परत केली जावीत.

एच-११९[१००००+-१०-४-८८]

५. कोषागार/उपकोषागार अधिका-यांनी वरील सूचना सर्व आहरण व संवितरण अधिका-यांच्या लक्षात तातडीने आणाव्यात.

६. ग्राम विकास विभाग, नगर विकास विभाग आणि नगरपालिका प्रशासन संचालनालय यांनी या गणनेबाबतच्या सूचना सर्व जिल्हा परिषदा व सर्व नगर परिषदा [अ, ब, क वर्ग] यांना द्याव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ग. रा. बपोरीकर,
उप सचिव, वित्त विभाग.

प्रति,

राज्यपालांचे सचिव,
मुख्य मंत्री यांचे सचिव,
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक,
सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व विभाग प्रमुख,
सर्व कार्यालय प्रमुख,
* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
* प्रबंधक, मूळ शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
* प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
* संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,
उप संचालक, लेखा व कोषागारे, पुणे/नाशिक/नागपूर/औरंगाबाद,
अधिदान व लेखा अधिकारी, बॅकबे रेक्लेमेशन स्कीम, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई,
अधिदान व लेखा अधिकारी, बांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रे, मुंबई,
राज्यातील सर्व कोषागार, उपकोषागार अधिकारी,
राज्यातील सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, व मुख्य वित्त व लेखा अधिकारी,
अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई,
सर्व जिल्हा सांख्यिकी अधिकारी,
सर्व प्रादेशिक उप संचालक, प्रादेशिक कार्यालय, अर्थ व सांख्यिकी संचालनालय,
कार्यासन एसईआर-७, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
कार्यासन कोषागारे-४, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई [निवड नस्ती].

----------
* पत्राने.

************

एच-११९[१०,००० +१०-४-८८]

--// ४ //--

क्रमांक आस्थापना /का. वि. ८४५/ई-४/८८
पुणे, दिनांक :- 21 JUN 1988 -६-१९८८

प्रत :- उपसंचालक भूमि अभिलेख, पुणे, मुंबई, नाशिक, नागपूर, औरंगाबाद, अमरावती यांचेकडे चार जादा प्रतीसह माहीती व जरुर त्या पुढील कार्यवाहीसाठी सस्नेह अग्रेषित.

प्रत :- कार्यासन अधिकारी, अ-२, अ-३, ई-२ यांना माहीतीसाठी

प्रत :- रेकॉर्ड

जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
भूमि अभिलेख, [महाराष्ट्र राज्य] पुणे
यांचेकरिता.